# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२-२१६५९४ E-Mail – arcllegesectiongug48@gmail.com

**(डॉ.एस.एम.रोकडे)**
**संचालक (प्रभारी)**

**क्र./गो.वि./महा.वि/ ५०९७/२०१६**
**दिनांक १९ /०१/२०१६**

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
संलग्नीत सर्व महाविद्यालये

**विषय :- केंद्रशासन पुरस्कृत पोस्टमॅाट्रिक शिष्यवृत्ती योजनेतील नुतणीकरणच्या अर्जाबाबत.**

संदर्भ :- १. सहसंचालक(उ.शि)नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. उशिनाग/सह/अल्पसंख्यांक शिष्य/६७८८/२०१५, दिनांक १४/१२/२०१५ (प्राप्त दि. ०४/०१/२०१६)
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/अल्प सं. शिष्य./१४अई /१२९३५, दिनांक १४/१२/२०१५ (प्राप्त दि. १५/०१/२०१६)

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयांचे अनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी मागिल वर्षी नविन अर्ज भरून या योजनेचा लाभ घेतलेला आहे, असे विद्यार्थी/लाभार्थी पुढील वर्षी नुतणीकरण अर्ज अल्प प्रमाणात सादर करीत आहे असे मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग यांचे निदर्शनास आले आहे. जास्तीत जास्त संख्येनी विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा, करीता शासनाने संदर्भिय पत्रानूसार दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून कार्यवाही घेण्यात यावी.

कळावे,

**सहपत्रे- वरिलप्रमाणे**

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक(प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलीपी:- १. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.**
**२. मा. सिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.**

महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्च शिक्षण नागपूर विभाग, नागपूर. जुने मॉरीस कॉलेज ईमारत, सिताबर्डी, नागपूर
(दुरध्वनी क्रमांक २५५४२१०/फॅक्स क्रमांक ०७१२-२५६१७१३)
Email : jdhengp@rediffmail.com

क्रं.उशिनाग/सह/अल्पसंख्याक शिष्य/१७८८/२०१५

दिनांक १४/१२/२०१५

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिव कार्यालय
आवक क्र. 8797 दि. 31/12/15

प्रती,
१. कुलसचिव,रातुम, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव,रातुम, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. सहसंचालक तंत्रशिक्षण, सदर,नागपूर
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन,नागपूर
६. विभागीय उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
७. सर्व प्राचार्य/संचालक शास/अशासकीय महाविद्यालये/संस्था नागपूर विभाग, नागपूर
८. शिक्षणाधिकारी माध्यमिक नागपूर/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली/भंडारा/गोंदिया

**विषय :- केंद्रशासन पुरस्कृत पोस्टमॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेतील नुतणीकरणच्या अर्जाबाबत**

**संदर्भ** - महाराष्ट्र शासन संचालनालय उच्चशिक्षण पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/अल्प.सं.शिष्य/ १४ अई/ १२९३५/दिनांक १४ डिसेंबर २०१५.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कळविण्यांत येते कि ज्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी नविन अर्ज भरून या योजनेचा लाभ घेतलेला आहे असे विद्यार्थी/लाभार्थी पुढील वर्षी नुतणीकरण अर्ज अल्प प्रमाणात सादर करीत आहे असे दिनांक २.१२.२०१५ रोजी मानंनिय प्रधान सचिव , अल्पसंख्यांक विभाग यांचे निदर्शनास आलेले आहे. करीता जास्तीत जास्त संख्येनी विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा करीता शासनाने संदर्भिय पत्रानुसार सुचना दिलेल्या आहेत. सुचनांचे काटेकोरपणे पालन करून अवलोकन करावे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 6058 दिनांक 1/1/16
जा. क्र. .......... दिनांक..................

A.M. Rahatgaonkar
सहसंचालक उच्चशिक्षण
नागपूर विभाग, नागपूर

प्रत - मा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा.पुणे -१ यांना माहितीकरीता सादर.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
... क्र. 6062 दिनांक 1/1/16
... क्र. 4013 दिनांक 5/1/16

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 2032 दिनांक 5/1/16
जावक क्र. 992 दिनांक 6/1/16

महाराष्ट्र शासन
संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in | E-mail: scholarshiphd@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ | फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्र.उशिसं/अल्प सं. शिष्य./१४अई /12935 दिनांक 14 DEC 2015

प्रति,

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरू कार्यालय
आवक क्र. 17 दि. 1/1/16

**विषय – केंद्र शासन पुरस्कृत पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेतील नूतनीकरणाच्या अर्जाबाबत.**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००७/(५४२/०७)/तां.शि.-१/दिनांक २१/१/२००८ अन्वये राज्यात अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. केंद्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार याबाबत प्रतिवर्षी राज्यस्तरावरील वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात येते तसेच सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांची कार्यशाळा या संचालनालयात घेण्यात येते व त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची कार्यशाळा घेऊन योजनेबाबतच्या मार्गदर्शक सूचना देण्याबाबत कळविण्यात येते.

महाराष्ट्र राज्यासाठी दरवर्षी सदर शिष्यवृत्तीसाठीचे संच केंद्रशासनाकडून निश्चित केलेले असतात. सदरचे संच हे फक्त नवीन शिष्यवृत्तीसाठी निर्धारित केलेले असतात. तथापि नूतनीकरणासाठी संचाची मर्यादा निश्चित केलेली नाही. जेवढया विद्यार्थ्यांना मागील वर्षी नवीन मंजूरीसाठी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे साधारणपणे तेवढया विद्यार्थ्यांचे नूतनीकरणाचे अर्ज येणे अपेक्षित आहे. सदर वस्तुस्थिती असतानाही मागील काही वर्षातील नूतनीकरणाच्या संचाची आकडेवारी पाहिल्यास जेवढया विद्यार्थ्यांना मागील वर्षात या योजनेखाली शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे तेवढे विद्यार्थी नूतनीकरणास अर्ज करत नाहीत असे दिसून आलेले आहे. सदरची बाब उचित नसून दिनांक २/१२/२०१५ रोजी माननीय प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विभाग यांनी नूतनीकरण अल्प प्रमाणात होत असल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

उपरोक्त बाब विचारात घेऊन आपणास खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. आपल्या विभागातील आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२. अशा महाविद्यालयातील सर्व अल्प संख्यांक पात्र विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतील याबाबत पाठपुरावा करण्यात यावा. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

अ) आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांची बैठक घेऊन या योजनेअंतर्गत सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी त्यांचे स्तरावरुन विद्यार्थ्यांमध्ये जागृती करणेबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या शिष्यवृत्तींबाबतची माहिती महाविद्यालयाच्या नोटीसबोर्डवर लावणेबाबत कळविण्यात यावे.

..2/

ब) महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशाच्यावेळीच शिष्यवृत्तीबाबतची माहिती देण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

क) अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीबाबतची माहिती मिळण्यासाठी महाविद्यालयात एका समन्वयकाची नियुक्ती करण्यात यावी. या समन्वयकाने महाविद्यालयातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची नोंद ठेवणारी एक नोंदवही ठेवावी व नोंदवहीतील पात्र विद्यार्थ्यांनी नवीन/नूतनीकरणाबाबतचे अर्ज भरण्याबाबत पाठपुरावा करण्यात यावा. अर्ज भरतांना विद्यार्थ्यांना अडचणी येत असल्यास त्यांना मार्गदर्शन करावे.

ड) महाविद्यालयांच्या भेटीच्या वेळी महाविद्यालयातील अल्पसंख्यांक विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतात किंवा नाही याबाबतची पडताळणी करावी.

३. आपल्या विभागांतर्गत महाविद्यालयांमध्ये नेमण्यात आलेल्या समन्वयकांची माहिती सोबत दिलेल्या प्रपत्रात भरुन या संचालनालयास पाठविण्यात यावी. म्हणजे सदर शिष्यवृत्तीसंबंधीच्या माहितीबाबत संबंधित समन्वयकांसोबत संपर्क साधता येईल.

उपरोक्त प्रमाणे सूचनांचे पालन करुन आपल्या विभागातील सर्व पात्र विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतील याची दक्षता घेण्यात यावी.

**मागील काही वर्षात नुतनीकरण पुरेशा प्रमाणात न झाल्याने आपल्या विभागातील काही महाविद्यालयांना समक्ष भेट देवुन नुतनीकरण न होण्याची कारणे जाणुन घ्यावीत व तसे या संचालनालयास कळविण्यात यावे.**

आपल्या अधिनस्त नसणाऱ्या महाविद्यालयांना सदर सूचना देण्यासाठी संबंधित विभाग प्रमुखांना (उपसंचालक कार्यालय, तंत्रशिक्षण कार्यालय इत्यादी.) याबाबत कळवुन त्यांचे स्तरावरुन याबाबतची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे.

सदर बाबत मा. प्रधान सचिव, अल्प संख्यांक विकास विभाग यांचेकडे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात बैठक होणार असल्यमुळे उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच महाविद्यालयांकडून प्राप्त झालेली नूतनीकरण न होण्याबाबतची कारणे याबाबतची माहिती दिनाक २०.१२.२०१५ पर्यंत या संचालनालयास सादर करावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत -

१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा.प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.